(9)

# - गृहिणी -

एक दिवस शेजारच्या भाभी माझ्याकडे आल्या होत्या. त्यांचं कांहीं काम होत ते झाल्यावर त्या मला म्हणाल्या भाभीजी "आपके घरमे कितनी शांती है। आपके घरमे लडकियाँ है सो कितनी रोनक आती है। नही तो हमारे घरमे बच्चे उधम मचाते है दिनभर झगडते है बहुत तकलीफ देते है।

तिला दोन्ही मुलगे होते. खूप मस्ती करायचे पण जिला मुलीच आहेत तिच्याकडे तेहां समाज वेगळ्याच नजरेने पाहात असे. पण तिच्या बोलण्याने माझ्या मनात विचार तरंग उठले.

मुलगा आणि मुलगी असा फरक का? आजची स्त्री आता नुसती गृहिणी राहिलेली नाही. ती पुरुषांच्या बरोबरीने सगळ्याच क्षेत्रांमध्ये आघाडीवर आहे. आताची नवीन पिढी तर सगळ्याच मुली करियर माईंडेड असतात. त्यांना प्रथम करियरवर फोकस करायचं असतं. त्यानंतर लग्न, संसार वगैरे पाहायचे.

एक काळ असा होता की स्त्री घर संसार यातच बुडून जात होती. संसार आणि त्यानुसार तिची कर्तव्य या गोष्टींना सुद्धा तिला करियर इतकंच प्राधान्य द्यावं लागत होतं. म्हणजे तिचं गृहकृत्यदक्ष असणं हेच Profession होतं. असं म्हणायला हरकत नाही.

आज नोकरी करणाऱ्या स्त्रिया नोकरी आणि घर दोन्ही आघाड्या सांभाळत आहेत. त्या दोन्ही डगरींवर नाचत असतात. पण त्यांची किती कुतरओढ होते हे आपण पाहातोच. कांहींना आर्थिक तोंडमिळवणी साठी दोन्ही आघाड्या सांभाळाव्या लागतात. कांहींना हौसेखातर नोकरी करायची असते.

चोवीस तास गृहिणींच्या बाबतीत खूप मतमतांतर असतात. नोकरदार स्त्रियांना वाटतं गृहिणींना दुपारी आराम असतो. एकदा नवरा आणि मुलं आपापल्या

कामाला बाहेर गेले की यांना आरामच. हा खरं तर वादाचाच विषय आहे. गृहिणी पद भूषवणं सोप नाही. नोकरी करणाऱ्यांना कामाचा मोबदला मिळतो. गृहिणीला काय मिळत?
उलट संध्याकाळी मंडळी घरी आल्यावर नाश्ता तयार ठेवायचा. त्यावरुन सुध्दा हेच का केलं म्हणून मंडळींची चिडचिड किंवा का केलं नाही म्हणून त्यांच वाकताडन तिने शांतपणे ऐकायचं त्यांनीच त्यांच्या वस्तू सकाळी अस्ताव्यस्त फेकलेल्या तिनेच आवरुन ठेवायच्या त्यांना द्यायच्या. बरं! पैशाने मोबदला तिला नको. कारण ती जे करते ते आत्मियतेने प्रेमानेच पण निदान तिच्या कष्टांची जाणीव ठेऊन दोन गोड प्रेमाचे शब्द तरी.

नोकरदार स्त्री पण खूप कष्ट करते नाही असं नाही पण तिला आर्थिक स्वातंत्र्य असतं. ती डाव्या उजव्या हाताला मोलाची माणसं ठेवू शकते शिवाय आधुनिक यंत्रांच्या सुखसोयी असतातच.

असा हा खूप वादाचा विषय आहे. त्याला अंत नाही. आज आमची पिढी निवृत्त झाली आहे. त्या आमच्यासारख्या बऱ्याच जणींचे गृहकृत्यदक्ष हेच Profession होतं बरं का!



आशा पावगी.
"आनंदवन" - B-10
वृंदावन कॉम्प्लेक्स
कोथरुड.